# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२.०६.२०२४ (रविवार)**


---

### अवैधरित्या विनापरवाना रेती चोरी करणा—या आरोपीतांवर कारवाई

दिनांक ०१.०६.२०२४ रोजी फिर्यादी हे स्टाफसह पोलीस स्टेशन रामटेक परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना अवैधरित्या विना परवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अश्या विश्वसनीय खबरेवरून माहीती मिळाल्यान`मौजा काचुरवाही येथे नाकाबंदी करून एक **१० चक्का टिप्पर क एम एच ४० एके २२५१ ची पाहणी केली असता त्यात अवैधरित्याविनापरवाना ८ ब्रास रेती कि २४०००/—रू असे दिसल्याने टिप्पर कि २०,००,०००/— रू असा एकुण २०२४०००/—रू चा दिसुन आला.** नमुद टिप्पर चालक नामे—**परमानंद मधुकर भोयर वय ३२ वर्ष रा बोरी राणी ता पारशिवनी २. निलेश गोविंद पाली वय ३५ वर्ष रा छोटी अजनी ता कामठी जि नागपूर** यांचेवर पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३७९,१०९ सहकलम ४८(७)(८)महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४,२१ खान व खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, व त्यांचे स्टॉफ नी पार पाडली.

### अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारू ची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ०१/०६/२०२४ रोजी पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत मौजा खानगाव डोंगरगाव येथे पारधी बेडा असुन त्या बेड्यावर पारधी समाजाचे लोक अवैधरित्या हातभट्टी मोहाफुलाची गावठी दारू गाळुन त्याची विक्री करतात अशी विश्वसनीय माहीती मिळाल्याने सदर ठिकाणी रेड केली असता आरोपी नामे— **प्रतिभा राणा पवार वय ३५ वर्ष रा खानगाव** यांचे ताब्यातुन १) ड्रम मध्ये अंदाजे २० लिटर मोहाफुल रसायण सडवा किंमत ४००/— रू २) प्लॉस्टिक ड्रम गाडुन ठेवलेले प्रत्येकी ड्रम मध्ये १०० लिटर मोहाफुल रसायण सडवा किंमत २४०००/—रू ३) काळया रंगाच्या रबरी टयुब मध्ये अंदाजे ५० लिटर प्रमाणे एकुण ३०० लिटर हातभटी मोहाफुलाची गावठी दारू किंमत १५,०००/— रू ४) एकुण ७ ड्रम , जळाउ लाकडे दारू गाळण्याचे साहित्य किंमत ४,१००/— रू एकुण ४३,५००/— रू चा माल तसेच आरोपी नामे— **सौ माधुरी राणा पवार वय २८ वर्ष रा खानगाव ता काटोल** यांचे ताब्यातुन अंदाजे ३० लिटर मोहाफुल रसायण सडवा किंमत ६०० रू २) १६ प्लॉस्टिक ड्रम गाडुन ठेवलेले प्रत्येकी ड्रम मध्ये १०० लिटर मोहाफुल रसायण सडवा किंमत ३२,००० रू, ३) ३ काळया रंगाच्या रबरी टयुबमध्ये अंदाजे ५० लिटर प्रमाणे एकुण १५० लिटर हातभटी मोहाफुलाची गावठी दारू किंमत ७,५००/— रू ४) एकुण १७ ड्रम, जलाउ लाकडे दारू गाळण्याचे साहित्य किंमत ५,७०० रू एकुण ४५,५०० रू चा **असा एकुण ८९०००/— रू चा माल जप्त** करून दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, सपोनि खोब्रागडे, सफौ/धनराज भुक्ते, तसेच पोलीस स्टेशन कोंढाळी नरखेड व जलालखेडा येथील स्टॉफ नी पार पाडली.

## अवैधरित्या हत्यार बाळगणारा आरोपी पोलीसांच्या जाळयात

दिनांक ०१.०६.२४ रोजी पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत खदान नं ३ परीसरात पेट्रालिंग करीत असता गोपनिय खात्रीशीर माहीती मिळाली कि, रेकार्डवरील आरोपी शुभम रवि गजभीये हा अवैध शस्त्र बाळगतो व ते शस्त्र त्यानी घरी लपवुन ठेवले आहे. अश्या गोपनिय खात्रीशीर माहीतीची सहानिशा करून त्याचे घरी गेलो असता त्याचे दिवानच्या खाली एका काळया रंगाच्या प्लास्टीक कवर मध्ये एक धारदार निमुळता चाकु ज्याची मुठ प्लास्टीकची असुन एकुण लांबी १६ किमती ३००/— रू चा पंचासमक्ष मिळुन आला. सदर शस्त्राबाबत त्याचे पत्नीला विचारपुस केली असता सदरचे शस्त्र हे तिचे पती नामे— शुभम रवि गजभीये याचे असल्याचे सांगितले सदर गुन्हयातील आरोपी नामे— रवि गजभीये वय २६ वर्ष रा खदान नं ६ याचेवर अवैधरीत्या बिनापरवाना धारदार चाकु बाळगल्याने सदर इसमाविरूध्द कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पाटील, सपोनि चव्हान, पोहवा/सोनवणे, महेश बिसने, सुशिल तेलंग, मपोशि स्वाती यांचे पथकाने स्टॉफ नी पार पाडली.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**